2018 VI 07 | 1430 | Seat No. :

Time : 2½ Hours

**MARATHI LANGUAGE – II**

**Subject Code**

| H | 4 | 2 | 3 |
|---|---|---|---|

**Total No. of Questions : 8** **(Printed Pages : 4)** **Maximum Marks : 80**

***सूचना :*** *i) प्रत्येक मुख्य प्रश्नाचे उत्तर **नव्या** पानावर लिहा.*
*ii) प्रश्नांचे क्रमांक **स्पष्ट** लिहा.*
*iii) **उजव्या** बाजूचे अंक प्रश्नांचे **गुण** दर्शवितात.*

1. अ) खालीलपैकी कोणत्याही **एका** वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा : **[6]**

1) ''अन्न आलंच नाही. मग जाणार कुठं ?''

2) ''तर त्यावेळी शंभर रुपये द्यावे लागतील''.

3) ''शोक करण्याची वेळ आली तरी शोक करू नकोस''.

ब ) खालीलपैकी कोणत्याही **एकाचे** संदर्भासह स्पष्टीकरण लिहा : **[6]**

1) चुकलिया माय बालके रडती ।
झाले मजप्रती तैसें आता ।।

2) काट्यासारखं सलायचं की फुलासारखं फुलायचं ?
तुम्हीच ठरवा.

3) गुणगुणावं, स्वत:साठी, सोयऱ्यांसाठी
नंतर खुशाल ज्वाला होऊन विरावं.

2. अ) खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे **3** ते **4** ओळींत लिहा : **[6]**

1) माशेलकरांच्या आईने त्यांना शिक्षणासंबंधी कोणता उपदेश केला ?

2) सर्कशीच्या तंबूत लेखकाला रडे का कोसळले ?

3) आशूला अपघात कसा झाला ?

ब) खालील कवितेच्या ओळी कंसातील योग्य शब्द वापरून पूर्ण करा : **[4]**

1) विवेकाची ठरेल ओल । ऐसे बोलावे कीं बोल ।
आपुल्या मते उगाच चिखल । . . . नको रे ।।
(मालवूं , कालवूं , घालवू )

2) जरि आंग्लभूमिभयभिता, रे,
अबला न माझि ही . . . , रे.
(आई, माय, माता)

3) गुंतलेले प्राण ह्या . . . माझे.
(रानात, वनात, जंगलात)

4) मी जानते ग माये तुज्या . . . कळा
पाच कच्चीबच्ची नि दारूड्या दादला.
(मनाच्या, हृदयाच्या, काळजाच्या)

3. अ) खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे उत्तर **7** ते **8** ओळींत लिहा : **[5]**

1) श्याम स्वत:ला कृतघ्न का म्हणतो ?
2) रावसाहेबांच्या सभेला जमलेल्या चाहत्यांना सभेला आल्याचा पश्चाताप का झाला ?

ब) खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे उत्तर **7** ते **8** ओळींत लिहा : **[5]**

1) संत एकनाथांनी आपल्या गुरूचे महात्म्य कसे वर्णन केले आहे ?
2) कवी सुरेश भट यांनी उष:काल होता होता या कवितेतून कोणती कैफियत मांडली आहे ?

4. अ) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांच्या जाती लिहा : **[4]**

अ) त्याच्या कडेलाच भला <u>मोठा</u> खडक होता <u>आणि</u> त्यावर पांढराशुभ्र गायबगळा बसून होता.
आ) <u>हत्ती</u> हळूहळू डबक्या<u>जवळ</u> गेला.

आ) खालील शब्दांची भाववाचक नामे लिहा : **[3]**

अ) तृप्त
आ) पोरका
इ) सावध

इ) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा : **[3]**

अ) निराशा

आ) जीवन

इ) सत्य

ई) खालील शब्दांची विशेषणे लिहा : **[2]**

अ) प्रभाव

आ) कृपा

उ) खालील शब्दांचे वचन बदला : **[2]**

अ) पेढे

आ) इमारत

ऊ) खालील शब्दांचे लिंग बदला : **[2]**

अ) देव

आ) शिक्षिका

ए) **'प'** गटातील वाक्प्रचार आणि **'फ'** गटातील वाक्प्रचारांचे अर्थ यांच्या योग्य जोड्या जुळवून लिहा : **[4]**

| **'प'** | **'फ'** |
| --- | --- |
| अ) कान टवकारणे | स्वस्तात घेणे |
| आ) मन सैरभैर होणे | प्रभाव टाकणे |
| इ) रंगात येणे | ऐकण्यासाठी सावध होणे |
| ई) मोडीत घेणे | अस्वस्थ होणे |
| | जबाबदारी स्वीकारणे |
| | खुलून दिसणे |

5. खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे लिहा :

पूर्वीच्या काळी युरोपात ग्रीसचा उदय झाला. गेल्या शतकाच्या अखेरीस पूर्वेकडे जपानचा उदय झाला. त्यावेळी ग्रीस किंवा जपान याच्या भोवतालच्या देशातील परिस्थिती त्यांच्यापेक्षा निराळी होती, असे नाही. भौतिक परिस्थिती जवळजवळ तीच होती. तरी ग्रीस व जपानी मानवाने आपल्या अंतरातील त्याग, विवेक, कष्ट करण्याची व यातना सोसण्याची सिद्धता, उच्च आकांक्षासाठी वाटेल ती किंमत देण्याची मनाची तयारी इत्यादी अनेक प्रकारचे धन दोन्हीं हातांनी उपसून बाहेर काढले व आपला उत्कर्ष करून घेतला. याचा अर्थ असा, राष्ट्राच्या उन्नतीसाठी निर्णायक ठरणारे धन म्हणजे 'मानवधन' होय. विवेक, त्याग, धैर्य, प्रज्ञा, निष्ठा या मानवी सद्गुणांचे संवर्धन करा. नवे राष्ट्र घडवायचे तर नवी मानवमूर्ती प्रथम घडली पाहिजे.

–पु. ग. सहस्त्रबुद्धे

**प्रश्न :**

1) ग्रीस व जपान यांनी कोणत्या गुणांच्या मदतीने आपला उत्कर्ष करून घेतला ? **[1]**

2) राष्ट्राच्या उन्नतीसाठी निर्णायक ठरणारे धन कोणते ? **[1]**

3) कोणत्या गुणांचे संवर्धन केले पाहिजे ? **[1]**

4) उताऱ्याला योग्य शीर्षक द्या. **[1]**

6. अ) 'ज्ञानज्योती उच्च माध्यमिक विद्यालय', फोंडा येथे पार पडलेल्या शिक्षकदिनाचा वृत्तान्त 8 ते 10 ओळींत लिहा. **[5]**

ब) म्हापसा येथील 'ज्ञानविकास उच्च माध्यमिक विद्यालयाने' आयोजित केलेल्या वार्षिक बक्षीस वितरण सोहळयाची कार्यक्रमपत्रिका तयार करा. **[4]**

7. 'वाढती बेकारी' या विषयावर दोन मित्रमैत्रिणींमधील संवाद 10 ते 12 ओळींत लिहा. **[5]**

8. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे **वीस** ओळींत निबंध लिहा : **[10]**

1) वर्तमानपत्रे नसती तर . . .

2) प्रगतीच्या मार्गावरील गोवा

3) माझा आवडता खेळाडू

4) फाटक्या नोटेचे आत्मवृत्त

5) कधी पटणार स्वच्छतेचे महत्व.

---